N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

## प्रथम खबर अहवाल

(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. District (जिल्हा): गोंदिया    P.S. (पोलीस ठाणे): गोंदिया शहर    Year (वर्ष): 2026

FIR No. (प्रथम खबर क्र.): 0757    Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 17/09/2026 22:43 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):

1 Day (दिवस): गुरूवार    Date from (दिनांक पासून): 17/09/2026    Date To (दिनांक पर्यंत): 17/09/2026

Time Period (कालावधी):    Time From (वेळेपासून): 12:44 तास    Time To (वेळेपर्यंत): 15:27 तास

(b) Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):    Date (दिनांक): 17/09/2026    Time (वेळ): 22:43 तास

(c) General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):    Entry No. (नोंद क्र.): 066    Date and Time (दिनांक आणि वेळ): 17/09/2026 22:43 तास

4. Type of Information (माहितीचा प्रकार): लेखी

5. Place of Occurrence (घटनास्थळ):

1. (a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर): उत्तर, 1 कि.मी.    Beat No. (बीट क्र.):

(b) Address (पत्ता): वित्त विभाग पंचायत समिती कार्य,गोंदिया

(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव): गोंदिया शहर

District (State) (जिल्हा (राज्य)): गोंदिया (महाराष्ट्र)



CamScanner

6. Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):

(a) Name (नाव): पोलीस निरीक्षक अरविंद पुंडलिक राऊत

(b) Father's Name (चे नाव ): पुंडलिक राऊत

(c) Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष): 1985

(d) Nationality (राष्‍ ट्रीयत्‍ व):भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No. (पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख ):

Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) Occupation (व्यवसाय):

(i) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गोंदिया, राम नगर, गोंदिया, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गोंदिया, राम नगर, गोंदिया, महाराष्ट्र, भारत |

(j) Phone number (फोन नं.):

Mobile (मोबाइल क्र.): 91-9827529847



CamScanner

7. **Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या): 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | संदीप शाहूराव सानप | | वडील चे नाव : शाहूराव सानप | 1. Town/Village (शहर / गाव): मु वडझरी ता पातोडा,Tehsil (तहसील): बिड,Police Station (पोलीस ठाणे): पाटोदा,District (जिल्हा): बीड,State (राज्य): महाराष्ट्र,भारत<br>2. पंकज तुरकर यांचा घरी किरायाने,Town/Village (शहर / गाव): हनुमान नगर कुडवा,Tehsil (तहसील): गोंदिया,Police Station (पोलीस ठाणे): गोंदिया शहर,District (जिल्हा): गोंदिया,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

तक्रार प्राप्त होताच तात्काळ

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | मोबाईल फोन | एक आयफोन 15 PIUS मोबाईल | 95,000.00 |
| 2 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | टेप रेकॉर्डर | 3सेनडेस्क कंपनीचे 32जी.बी जी क्षमतेचे मेमोरीकार्ड | 1.00 |



CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 3 | कागदपत्रे आणि मुल्यवान रोखे | इतर कोणतीही कागदपत्रे | SBIबँकेत चार लक्ष रु जमा केल्याची पावती | 1.00 |
| 4 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500रुपये किंमतीचे 8चलनी नोटा | 4,000.00 |
| 5 | इतर | घरगुती वस्तु | एक निळसर रंगाचा किलर कंपनीचा जिन्स | 1.00 |

10. **Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :** 99,003.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|
| | |

12. **First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

(फिर्याद)
दिनांक :- 17-09-2026
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गोंदिया
नाव :- अरविंद पुंडलिक राऊत, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गोंदिया मो. क्र. 8275298475

आम्ही शासनातर्फे फिर्याद देतो की, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गोंदिया येथे पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहोत. दिनांक 17-09-2026 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गोंदिया कार्यालयात हजर राहून कार्यालयीन कामे करीत असताना वेळ 10-30 वा. सुमारास मा. पोलीस उपअधिक्षक श्री. निलेश लोधी यांनी त्यांच्या दालनात बोलवून त्यांच्या समोर बसून असलेल्या वयोवृद्ध महिला ह्या उषा शंकरराव रंगारी वय 64 वर्ष, व्यवसाय-सेवानिवृत्त शिक्षिका, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, दवनीवाडा अशा असून यांची पंचायत समिती, शिक्षण विभाग गोंदिया येथील श्री. सानप, लिपीक यांच्या विरुद्ध त्यांच्या पेंशनचे एरीयर्स बिल मंजूर करून चेक देण्यासाठी लाच मागत असल्याची तक्रार असल्याने त्यांची तक्रार नोंदवून घेण्यास सांगून पुढील कारवाईबाबत मार्गदर्शन केले. त्यावरून तक्रारदार यांना आपले कक्षात नेऊन त्यांना त्यांचे नाव गाव व तक्रारीसंबंधाने विचारपूस करून त्यांची तक्रार लिहून देण्यास सांगितले असता त्यांनी त्यांची तक्रार स्वहस्ताक्षरात लिहून दिली ती खालीलप्रमाणे आहे.
तक्रार

दिनांक 17/09/2026

प्रति,



CamScanner

मा. पोलीस उपअधिक्षक साहेब,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गोंदिया.

विषय :- गैर-अर्जदार श्री. सानप, लिपीक, शिक्षण विभाग पंचायत समिती हे माझे पेंशनचे एरीयर्स बिल मंजूर करून चेक देण्यासाठी लाच मागत असल्याने त्यांचे विरुद्ध कारवाई होणेबाबत.

अर्जदार :- कु. उषा शंकरराव रंगारी वय 64 वर्ष, व्यवसाय-सेवानिवृत्त शिक्षिका, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, दवनीवाडा रा. खात रोड, रॉयल पॅलेस भंडारा, ता.जि. भंडारा

मो. क्र. 7028366982

महोदय,

सविनय विनंती अर्ज सादर करतो की, वरील नमूद पत्त्यावर आपले कुटुंबासह राहत असून मी डिसेंबर 2020 मध्ये जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, दवनीवाडा ता.जि. गोंदिया येथून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाली आहे. सेवानिवृत्त झाल्यानंतर मला पंचायत समिती शिक्षण विभाग गोंदिया येथून पेंशन मिळू लागली, मिळणाऱ्या पेंशनचे अवलोकन केले असता ती कमी मिळत असल्याचे माझ्या निदर्शनास आले तसेच मी संगणक हाताळण्याचे प्रशिक्षण घेऊन प्रमाणपत्र दिले असताना ते न केल्याबाबत दर्शवून माझ्या पेंशन मधून अंदाजे 1,20,000/- रु कपात केल्याचे निदर्शनास आले. तेव्हा मी एक ते दीड वर्षापूर्वी तारीख नक्की आठवत नाही मला मिळणारी पेंशन कमी असून ती दुरुस्त होऊन नियमाप्रमाणे मिळणेबाबत तसेच मी संगणक हाताळणीचे प्रमाणपत्र देऊन त्याचे कपात झालेले पैसे मिळणेबाबतचा अर्ज पंचायत समिती, शिक्षण विभाग गोंदिया येथे दिला होता. जुलै 2026 मध्ये तारीख नक्की आठवत नाही मी शिक्षण विभाग, पंचायत समिती गोंदिया येथे जाऊन येथील लिपीक श्री सानप यांना भेटून माझे कामाबाबत विचारणा केली असता त्यांनी तुमचे बिल पाच लाखाचे वर आहे ते मंजूर करण्यासाठी तुम्हाला रु. 5000/- द्यावे लागतील असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना माझ्याकडे आता एवढे पैसे नाहीत असे म्हणाले. तेव्हा त्यांनी आता तुमच्याकडे किती पैसे आहेत असे विचारले असता मी त्यांना माझ्याकडे 1000/- रुपये असल्याचे सांगितले. त्यांनी हजार रुपये आता द्या व राहिलेले चार हजार रुपये नंतर द्या असे म्हणून रु. 1000/- माझ्याकडून घेतले. त्यानंतर श्री सानप लिपीक यांनी मला फोन करून तुमचे बिल मंजूर झाले असून त्याचा चेक तयार आहे, राहिलेले रु. 4000/- घेऊन या व चेक घेऊन जा तेव्हा मी त्यांना मी व माझे पती आजारी असल्याचे सांगून बरे झाल्यावर चेक घेण्यासाठी येतो असे सांगितले. आता माझी तब्येत बरी झाली आहे. श्री सानप लिपीक शिक्षण विभाग, पंचायत समिती गोंदिया हे मागत असलेले रु. 4000/- ही कायदेशीर फी नसून स्वतः करिता लाच मागत असल्याने व त्यांना ही लाच रक्कम देण्याची माझी मुळीच इच्छा नसल्याने त्यांचे विरुद्ध तक्रार देत आहे. त्यांच्यासोबत माझे आर्थिक व्यवहार तसेच जुने वैमनस्य नाही. तरी त्यांच्या विरुद्ध कारवाई होण्यास विनंती आहे.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीवरून लाच मागणीची पडताळणी करून पुढील लाचेचा सापळा कारवाई आयोजित करण्यासाठी मा. तहसीलदार, तहसील कार्यालय गोंदिया यांना पत्र देऊन दोन शासकीय



CamScanner

पंच नामे कु. सुस्मिता अशोक हनुवते वय-30 वर्ष पद- महसूल सेवक तहसील कार्यालय गोंदिया व श्री दिनेशकुमार ग्यानीराम शेंडे वय 49 वर्ष पद- कनिष्ठ लिपीक, महसूल विभाग, तहसील कार्यालय गोंदिया यांना उपलब्ध करून घेतले. दोन्ही पंचांना तक्रारदाराने लोकसेवकाविरुद्ध लाच मागणी संबंधी तक्रार नोंदविलेली असून त्या तक्रारीवर लाच मागणी पडताळणी व सापळा कारवाई करून पुढील कायदेशीर कारवाई करावयाची आहे असे सांगून त्यांची संमती विचारली असता त्यांनी संमती दिल्याने कु. सुस्मिता अशोक हनुवते यांना पंच क्र. 1 तर श्री दिनेशकुमार ग्यानीराम शेंडे यांना पंच क्र. 2 म्हणून ठरविण्यात आले.

सापळा पथकाचा तसेच तक्रारदार यांचा दोन्ही पंचांना परिचय करून देऊन यांची एका लोकसेवकाविरुद्ध लाच मागणीसंबंधी तक्रार असल्याचे सांगून तक्रारदार यांची लिखित तक्रार दोन्ही पंचांना वाचव्यास दिली. ती तक्रार दोन्ही पंचांनी वाचून तक्रारदार यांनी कथन केल्याप्रमाणे असल्याने त्यावर स्वाक्षरी केल्यानंतर आम्ही स्वाक्षरी केली.

त्यानंतर गैर-अर्जदार श्री. सानप, लिपीक, शिक्षण विभाग, पंचायत समिती गोंदिया यांना लाचेमध्ये देण्यासाठी रु. 4,000/- हजर करण्यास सांगितले. त्यावरून त्यांनी स्वतःच्या बचतीतून त्यांच्याकडे जमा असलेल्या रु. 500/- दराच्या 08 भारतीय चलनी नोटा असे एकूण रु. 4000/- आमचेकडे जमा केले. त्या नोटांच्या क्रमांकाची यादी तयार करण्यात आली.

तक्रारदार व दोन्ही पंच यांना सदर कारवाईमध्ये उपयोगात येणाऱ्या अँथ्रॅसीन पावडर, अल्ट्राव्हायलेट लॅम्प त्यांचे वैशिष्ट्ये समजावून सांगून पोलीस अंमलदार यांचे मार्फत त्याचे प्रात्यक्षिक करून दाखविण्यात आले. त्याचप्रमाणे सदर कारवाईदरम्यान तक्रारदार व गैर-अर्जदार लोकसेवक यांचेमध्ये होणारे संभाषण कार्यालयीन व्हॉईस रेकॉर्डरद्वारे मेमरीकार्डमध्ये कशाप्रकारे ध्वनीमुद्रीत करण्यात येते यासंबंधाने व्हॉईस रेकॉर्डर, मेमरी कार्ड बाबत माहिती देऊन त्याचे देखील प्रात्यक्षिक पोलीस अंमलदार यांचे मार्फत करून दाखविण्यात आले. त्यानंतर सदर नोटांना दोन्ही बाजूने अँथ्रॅसीन पावडर लावून अँथ्रॅसीन पावडर लावलेल्या चलनी नोटा एकूण रु. 4,000/- एका कागदी लिफाफ्यात टाकून तो लिफाफा तात्पुरता ट्रॅप सुटकेसमध्ये सुरक्षित ठेवून दिला.

त्यानंतर तक्रारदार यांना पंच क्र. 1 यांचे पंचायत समिती, गोंदिया येथे पाठवून गैर-अर्जदार यांचे विरुद्धची लाच मागणी पडताळणी कारवाई करण्याचे तसेच सदर कारवाई स्थानिक असल्याने ला.प्र.वि.कार्यालय गोंदिया येथून करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा कारवाईतील सदस्यांना लाच मागणी पडताळणी कारवाई दरम्यान घेण्यात येणाऱ्या दक्षतेबाबत सूचना सांगून पंच क्रमांक 1 यांचे हस्ते तक्रारदार यांची अंगझडती घेतली. त्यानंतर सोनी कंपनीचे ICD-PX470 कार्यालयीन डिजिटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नवीन सेल व सॅनडिस्क कंपनीचा नवीन मेमरी कार्ड सिरीयल क्र. 5411XY8715ZZ चा टाकून व्हॉईस रेकॉर्डर वेळ 12.44 वाजता सुरू करून पंच क्र. 1 व तक्रारदार यांचे आवाजात लाच मागणी पडताळणी कारवाई करिता जात असल्याबाबतचे संभाषण ध्वनिमुद्रित करून तो व्हॉईस रेकॉर्डर कापडी पिशवीत ठेवून तक्रारदार यांचे जवळील निळ्या रंगाच्या बॅगमध्ये ठेवून दिले. तक्रारदार यांचेकडे वाहन नसल्याने



CamScanner

पंच क्र. 1 यांची स्कुटी क्र. एम.एच.35/एई 5440 ने तक्रारदार यांना पंच क्र. 1 यांचेसह लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गोंदिया येथून पंचायत समिती गोंदिया येथे लाच मागणी संबंधाने बोलणी करण्याकरिता पाठविण्यात आले. आम्ही, पंच क्र. 2 व सापळा पार्टीतील सर्व सदस्य ला.प्र.वि.कार्यालय गोंदिया येथेच थांबून राहिलो.

तक्रारदार हे गैर-अर्जदार श्री सानप यांचेशी बोलणी करून पंच क्र. 1 यांचेसह ला.प्र.वि.कार्यालय गोंदिया येथे परत आल्यावर त्यांचे गळ्यात असलेले व्हॉईस रेकॉर्डर बाहेर काढून पंच क्र. 1 यांचे आवाजात वेळ 13.55 वाजता बंद करण्यात आले. व्हॉईस रेकॉर्डरच्या मेमरी कार्ड मधील PRIVATE/SONY/REC_FILE/FOLDER-1 मध्ये फाईल 260917_1244.mp3 रेकॉर्ड झाल्याचे दिसून आले. सदर फाईल मधील संभाषण दोन्ही पंचांसमक्ष ऐकले व दोन्ही पंचांना ऐकविल्यावर त्यांच्यात झालेल्या संभाषणावरून गैर-अर्जदार सानप यांनी तक्रारदार यांचे पेंशनचे एरीयर्स बिल मंजूर करून चेक देण्याकरिता रु. 4,000/- लाच रक्कमेची मागणी करून ती लाच रक्कम स्वीकारण्याची तयारी दर्शविल्याची आमची व दोन्ही पंचाची खात्री झाली. त्यावरून गैर-अर्जदार यांचे विरुद्धची सापळा कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरविले.

त्यानंतर आमचे सूचनेवरून पंच क्र. 1 यांनी तक्रारदार यांची अंगझडती घेतल्यानंतर आमचे सूचनेवरून पो.हवा.संतोष शेंडे यांनी ट्रॅप सुटकेस मधून लाच रक्कमेचा लिफाफा बाहेर काढून पंच क्र. 1 यांचेकडे दिला. पंच क्र. 1 यांनी लाच रक्कमेचा लिफाफ्यातून लाच रक्कम बाहेर काढून तक्रारदार यांच्या जवळील बॅगच्या खिशामध्ये अलगद ठेवून दिल्या.

तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथक यांना सापळा कारवाई दरम्यान घेण्यात येणाऱ्या दक्षतेबाबत सूचना दिल्या. त्याचप्रमाणे अधिनस्त अंमलदार यांना गैर-अर्जदार यांनी लाच रक्कम स्वीकारल्याचा तक्रारदार यांनी नियोजित इशारा केल्यानंतर पुढील कारवाईचे कार्यालयीन मोबाईलमध्ये चित्रीकरण करावे अशा सूचना देऊन मोबाईलमध्ये 32 जीबी क्षमतेचे सॅनडिस्क कंपनीचे ज्याचा सिरीयल क्र. 5411XV871607 असलेला एक नवीन मेमरी कार्ड पंचांसमक्ष काढण्यात येऊन मोबाईलमधील मेमरी कार्ड स्लॉट मध्ये Insert केले. मोबाईल सेटिंग मध्ये जाऊन सदरचे मेमरीकार्ड मध्ये पूर्वीचा कोणताही डेटा जतन नसल्याची पंचांना खात्री करून दिली व सदरचे मोबाईलमध्ये व्हिडीओ चित्रीकरण करण्याचे सुनिश्चित करण्यात आले.

त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डरमधून लाच मागणी पडताळणी दरम्यान वापरण्यात आलेले मेमरी कार्ड बाहेर काढून त्याचे प्लास्टिक आवरणात ठेवून ट्रॅप सुटकेस मध्ये सुरक्षित ठेवून दिले व एक नवीन 32 जीबी क्षमतेचा सॅनडिस्क कंपनीचा सिरीयल क्र. 5411XY8717ZS चा असलेला मेमरी कार्ड पंचांसमक्ष काढून सदर डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये टाकले. वेळ 15-03 वा. व्हॉईस रेकॉर्ड सुरू करून त्यामध्ये तक्रारदार व पंच क्र. 1 यांचे आवाजात लाच रक्कम देण्यासाठी गैर-अर्जदार यांचेकडे जात असल्याचे संभाषण ध्वनिमुद्रित करून ते व्हॉईस रेकॉर्डर कापडी पिशवीत ठेवून तक्रारदार यांचे जवळील निळ्या रंगाचे बॅगमध्ये ठेवले. पंच क्र. 1 यांचेसोबत पंच क्र. 1 यांचे स्कुटीने गैर-अर्जदार यांना लाच रक्कम देण्यासाठी पंचायत समिती गोंदिया येथे पाठविण्यात आले. त्यानंतर आम्ही, पंच



CamScanner

क्र. 2, सापळा पथक असे शासकीय वाहनाने रवाना झालो व पंचायत समिती गोंदियाचे जवळ पोहोचून तक्रारदार यांचे नियोजीत इशाऱ्याची वाट पाहत बसलो.

काही वेळाने तक्रारदार हे पंच क्र. 1 सह पंचायत समिती गोंदियाचे दर्शनी ठिकाणी येऊन तक्रारदार यांनी आपल्या डोळ्यावरील नंबरी चष्मा काढून उजव्या हातात ठेवून गैर-अर्जदार यांनी त्यांच्याकडून लाचेची रक्कम स्वीकारल्याचा नियोजित इशारा केल्यावर सापळा पथकासह जाऊन गैर-अर्जदार संदीप शाहूराव सानप वय 31 वर्ष, पद-कनिष्ठ सहायक, वर्ग-3, आस्थापना विभाग पंचायत समिती गोंदिया यांना लाच रक्कमेसह गोंदिया यांना ताब्यात घेऊन कारवाई केली. सदर कारवाईचे मोबाईलमध्ये चित्रीकरण करण्यात आले आहे. तक्रारदार यांचे बॅगेत ठेवलेला व्हॉईस रेकॉर्डर बाहेर काढून त्यामध्ये पंच क्र. 1 यांचे आवाजात सापळा कारवाई पूर्ण झाल्याबाबत वक्तव्य ध्वनीमुद्रीत करून व्हॉईस रेकॉर्डर 15-27 वाजता बंद करण्यात आले. व्हॉईस रेकॉर्डरच्या मेमरी कार्डच्या PRIVATE/SONY/REC_FILE/FOLDER-1 मध्ये फाईल 260917_1503.mp3 रेकॉर्ड झाल्याचे दिसून आले.

लाच मागणी पडताळणी व सापळा कारवाई दरम्यान तक्रारदार व गैर-अर्जदार यांतील झालेल्या ध्वनीमुद्रीत संभाषणाची स्क्रिप्ट तयार करून त्यास परिशिष्ट-अ व परिशिष्ट-ब असे शीर्षक देण्यात आले. सदर संभाषण फाईलची हॅश व्हॅल्यू काढून सदरचे मेमरी कार्ड हिरव्या रंगाच्या कागदी वेगवेगळ्या लिफाफ्यात ठेवून त्यावर आम्ही व दोन्ही पंचांनी सह्या करून ते लिफाफे कार्यालयीन सीलने सीलबंद करून ट्रॅप सुटकेस मध्ये सुरक्षित ठेवून दिले. याबाबतच्या सविस्तर नोंदी पंचनाम्यात घेण्यात आल्या आहेत.

तरी, तक्रारदार कु. उषा शंकरराव रंगारी वय 64 वर्ष, व्यवसाय-सेवानिवृत्त शिक्षिका, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, दवनीवाडा रा. खात रोड, रॉयल पॅलेस भंडारा, ता.जि. भंडारा यांनी दिनांक 17-9-2026 रोजी दिलेल्या तक्रारीवरून दिनांक 17-09-2026 रोजीचे वेळ 12-44 वा ते 15-27 वा दरम्यान पंचांसमक्ष करण्यात आलेल्या लाच मागणी पडताळणी व सापळा कारवाई दरम्यान आलोसे संदीप शाहूराव सानप वय 31 वर्ष, पद-कनिष्ठ सहायक, वर्ग-3, आस्थापना विभाग पंचायत समिती गोंदिया यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे पेंशनचे एरीयर्स बिल मंजूर करून चेक देण्याकरिता रु.4,000/- लाच रक्कमेची पंचांसमक्ष मागणी करून ती लाच रक्कम स्वीकारून आपले लोकसेवक पदाचा गैरफायदा घेतला आहे म्हणून श्री संदीप शाहूराव सानप, आस्थापना विभाग पंचायत समिती गोंदिया यांचे विरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 (सुधारित अधिनियम 2018) चे कलम 7 प्रमाणे गुन्हा नोंद होणेकरिता कायदेशीर फिर्याद देत आहे.

(अरविंद राऊत)

पोलीस निरीक्षक

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गोंदिया



CamScanner

13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.
(केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):

(1) Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): PRAVIN DEVAJI BORKUTE (पोलीस निरीक्षक) or (किंवा):

(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव): Rank (हुद्दा):

No. (क्र.): to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)

(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):
or (किंवा)

(4) Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा): on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).

F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)

R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)

Signature Not Verified
Digitally Signed by: PRAVIN DEVAJI BORKUTE
Rank: I (Inspector)
Unique No: 91159381027000151
On: 9/17/2026 11:13:54 PM
At PS: GONDIA CITY, GONDIA

Registered by (नोंदणी अधिकारी)

Signature of Officer in charge, Police Station
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): PRAVIN DEVAJI BORKUTE

Rank (हुद्दा): I (Inspector)

No. (क्र.): 15101000402PDBM810M

17/9/2026.

14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)

15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)

Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen )
(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन्मतारीख / वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(सेंमी)) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | 1995 | | | | चेचक: होय |

| Deformities / Peculiarities (व्यंग / वैशिष्टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language/Dialect (भाषा/बोली) | Place of (चे ठिकाण) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल)

CamScanner